# महिलांसंबंधी धोरण

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

जून १९९४

# १. प्रस्तावना

१.१ महाराष्ट्रातील काही ज्ञात आणि असंख्य अज्ञात स्त्रियांनी अनेक लहान मोठ्या क्रांत्यांद्वारे इतिहास आणि समाजामध्ये लक्षणीय बदल केले. या स्त्रियांमुळे महाराष्ट्राच्या मातीला अभिनव कल्पनांची आणि नाविन्यपूर्ण संस्थांची जन्मभूमी अशी ख्याती प्राप्त झाली आहे. त्या स्त्रिया या धोरणाच्या स्फूर्तिस्थान आहेत.

१.२ या स्त्रियांनी नेहमीच बाजूला राहून पुरुष वर्गाला आगेकूच करण्याची संधी दिली. त्यांच्या मुलींना महाराष्ट्राचे आणि पर्यायाने भारताचे भवितव्य घडविण्याच्या कार्यात पुरुषांच्या बरोबरीच्या भागीदार म्हणून त्यांचे हक्काचे स्थान प्राप्त व्हावे त्यासाठी हा एक छोटासा प्रयत्न.

## २. पार्श्वभूमी

२.१ भारतीय घटनेने बहाल केलेला समानतेचा मूलभूत हक्क हा महिलांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे महिला व बालकांना झुकते माप देण्याची कायदेशीर तरतुदीचा घटनेत समावेश आहे.

२.२ महिलांसाठी विशेष आणि स्वतंत्र कार्यक्रम आखले जावेत हे एकीकडे मान्य करत असतानाच, स्वयंसेवी संघटना व संस्था यांचेमार्फत समाजकल्याणाच्या काही योजनांचे लाभ महिलांनाही मिळतील अशी आपली अपेक्षा होती. महिला वर्गाच्या विशेष गरजा व समस्या लक्षात घेऊन त्यांचेसाठी आपण स्वतंत्र यंत्रणा उभारली नसली तरी शिक्षण व आरोग्य या क्षेत्रांतील विविध शासकीय व स्वयंसेवी संस्थांमार्फत व्यापक प्रमाणावर महिलांना लाभ मिळवून दिले जातील अशी अपेक्षा होती. आजपर्यंत स्त्रियांबाबतचा दृष्टीकोन प्रामुख्याने 'कल्याणकारी' होता. स्त्रियासुद्धा पुरुषवर्गाप्रमाणेच विकास प्रक्रियेतील भागीदार आहेत असे न मानता त्यांना शासन यंत्रणेच्या औदार्याचा एक गरजवंत घटक असे मानण्यात आले.

२.३ या शतकाच्या सातव्या दशकापासून या दृष्टीकोनात हळूहळू बदल घडत गेला. 'कल्याणकारी' कल्पनांची जागा 'विकसनशील' दृष्टीकोनाने घेतली. सहाव्या पंचवार्षिक योजनेतील (१९७५–८०) महिलांसंबंधी तरतुदींमुळे बदलाची प्रक्रिया गतिमान झाली. कारण प्रथमच विकास प्रक्रियेस चालना देण्याची क्षमता स्त्री वर्गामध्ये आहे यावर भर देण्यात आला. तसेच स्त्रियांची प्रतिमा व त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याच्या गरजेकडे लक्ष वेधण्यात आले.

२.४ विकसनशील दृष्टीकोनावर आधारित अशी ही नवी संकल्पना मांडण्यात आली असली तरीही आजतागायत स्त्रियांच्या वेगळ्या परंतु तितक्याच न्याय्य गरजांची दखल घेण्याच्या दृष्टीने शासकीय यंत्रणा व दृष्टीकोन यात आवश्यक ते बदल घडवून आणण्याचे कार्य मात्र दुर्लक्षित राहिले. पुरुषांचे क्षेत्र हे 'सार्वजनिक' क्षेत्र आणि स्त्रियांचे मुख्य क्षेत्र म्हणजे 'घर' यासारख्या पारंपरिक विचारसरणीचाच पगडा अद्यापही शासकीय विचारसरणीवर आहे. त्यामुळेच महिलांच्या विकासासाठी अत्यावश्यक पायाभूत सेवा, सहाय्य सेवा आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विकास आराखड्यांतील विविध योजना अथवा प्रशिक्षण कार्यक्रम यांना नवी दिशा देण्याचे सुस्पष्ट प्रयत्न होत नाहीत.

२.५ विकासाच्या संकल्पनेच्या बरोबरीने सहभागाची संकल्पना आली. स्थानिक संस्था आणि त्यायोगे स्त्रियांच्या हाती सत्ता सोपविण्याच्या दृष्टीने पंचायत राज्य सुधारणा हे महत्त्वाचे